**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 28/01/2026

**आरोपी लोकसेवक** - श्री. गजानन मनसाराम बारवाल , ग्राम महसूल अधिकारी. (तलाठी) वर्ग 3, सिंधी काळेगाव सजा, ता.जि.जालना यांनी तक्रारदार यांचे कडे 5,000/- (पाच हजार रुपये) लाच मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- (तीन हजार रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे तालुका जालना, जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री. गजानन मनसाराम बारवाल , वय 36 वर्ष, पद-ग्राम महसूल अधिकारी. (तलाठी) वर्ग 3, नेमणूक - सिंधी काळेगाव सजा, जालना, रा. सिंधी बनवाडी ता.भोकरदन जि. जालना |
| लाच मागणी रक्कम | 5,000/- (पाच हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 3,000/- (तीन हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. शांतीलाल चव्हाण, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्रीमती.कोमल शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.जालना. |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तक्रारदार यांचे वडील मयत झालेले असून वारसा हक्काने फेरमध्ये नोंद घेण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी सिंधी काळेगाव यांच्याकडे दिनांक 27/ 01/2026 रोजी पूर्ण कागदपत्रे दिली असता . आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे 5,000/ रुपयाची मागणी केल्याने, तक्रारदारास लाच रक्कम द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार नोंदवली. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 28/01/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केलीअसता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे वारसा हक्काने फेरफार मध्ये नोंद करून, फाइल मंडळाधिकारी यांच्याकडे पाठवण्यासाठी 5000/-हजार रुपयांची पंचासमक्ष लाच मागणी करून, तडजोडीअंती 3,000/- हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.<br>आलोसे यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 28/01/2026 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान रुपनगर येथील मनोज वाघमारे यांच्या राहत्या घराचा गाळा भाडे तत्त्वावर घेऊन तलाठी सजा कार्यालय जालना येथे चालू केले होते. त्याचे समोर रोडवर आलोसे यांनी स्वतः तक्रारदार यांच्या कडून 3,000/-हजार रुपये लाच रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्वीकारली.आलोसे यांनी लाच रक्कम स्वीकारल्यानंतर पंचासमक्ष त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना, जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी जालना येथे केली असुन पुढील तपाट ला.प्र.वि.जालना घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री शांतीलाल चव्हाण यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ अशोक नागरगोजे, रविंद्र काळे, विलास चव्हाण, पो.अंम.चांगदेव बागुल, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.